सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड इमारत, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४.
Email Id: contact-secretary@mpsc.gov.in Website: https://mpsc.gov.in, https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc ०२२-६९३८५९००

क्रमांक : सीएमए-०४२६/प्र.क्र४२/२०२६/जाहिरात **दिनांक :- ०१ ऑगस्ट, २०२६**

-: प्रसिद्धीपत्रक :-

भरती प्रक्रिया सुसूत्रीकरण व सुधारणा संदर्भातील शासन निर्णय , सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : प्रानिमं-१२२४/प्र.क्र.७०/सेवा-४, (का.१३-अ), दिनांक ०५ मे, २०२६ अनुसार विविध नवीन संवर्गांचे मागणीपत्र कार्यालयास प्राप्त होत आहेत. सदर शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट २८ ते ७३ मध्ये शासन सेवेतील गट-ब (अराजपत्रित) व गट-क संवर्गातील पदभरतीकरीता सर्वसामान्य शैक्षणिक अर्हता आवश्यक असलेल्या पदांसाठी प्रशासकीय आणि विशिष्ट/तांत्रिक स्वरुपाची शैक्षणिक अर्हता आवश्यक असलेल्या पदांसाठी तांत्रिक असे वर्गीकरण करण्यात आले आहे. याअनुषंगाने प्रशासकीय व तांत्रिक पदभरतीकरीता महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त परीक्षेच्या विद्यमान परीक्षा योजनेमध्ये बदल करणे आवश्यक ठरते. सदर बदलांच्या अनुषंगाने शासन सेवेतील गट-क संवर्गाची परीक्षा पद्धती खालीलप्रमाणे राहील :-

१. परीक्षा योजनेमध्ये समाविष्ट सर्व प्रशासकीय व तांत्रिक संवर्गाकरीता एकच संयुक्त पूर्व परीक्षा घेण्यात येईल.

२. सर्व सामान्य शैक्षणिक अर्हता आवश्यक असलेल्या प्रशासकीय संवर्गांसाठी एकच मुख्य परीक्षा घेण्यात येईल.

३. तांत्रिक संवर्गांसाठी/विशिष्ट शैक्षणिक अर्हता आवश्यक असलेल्या संवर्गांसाठी त्या-त्या संवर्गाच्या शैक्षणिक अर्हतेनुसार प्रत्येक संवर्गासाठी स्वतंत्र मुख्य परीक्षा अथवा समान तांत्रिक शैक्षणिक अर्हता आवश्यक असणाऱ्या संवर्गांची एकच सेवा, या प्रमाणे मुख्य परीक्षा घेण्यात येईल.

४. **पूर्व परीक्षेचा निकाल :-** (१) पूर्व परीक्षेतील प्रशासकीय संवर्गाचा एकत्रित निकाल प्रसिद्ध करण्यात येईल.
(२) तांत्रिक संवर्गांचा संवर्गनिहाय निकाल प्रसिद्ध करण्यात येईल.

५. **मुख्य परीक्षेचा निकाल :-** मुख्य परीक्षेचा निकाल संवर्ग/सेवा निहाय प्रसिद्ध करण्यात येईल.

उपरोक्त बदलांच्या अनुषंगाने गट-क सेवेतील पदभरतीकरीता सविस्तर सुधारित परीक्षा योजना लवकरच संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

२. आयोगाच्या दिनांक २२ जुलै, २०२६ रोजीच्या शुद्धिपत्रकान्वये महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२६ अंतर्गत गट-क सेवेतील विद्यमान संवर्गाव्यतिरिक्त विविध नवीन संवर्गांचा समावेश करण्यात आला आहे. त्यानुसार सर्व सामान्य शैक्षणिक अर्हता उदा. मान्यताप्राप्त विद्यापीठातील पदवी/अभियांत्रिकी पदवी/विज्ञान शाखेतील पदवी/ पदवीसह टंकलेखन अर्हता इत्यादी आवश्यक असलेल्या संवर्गाकरीता एकच संयुक्त पूर्व परीक्षा व एकच संयुक्त मुख्य परीक्षा घेण्यात येईल. तसेच विशिष्ट/तांत्रिक स्वरुपाची शैक्षणिक अर्हता असलेल्या तांत्रिक संवर्गाकरीता उदा. सहायक मोटार वाहन निरीक्षक, गट-क, सहाय्यक मत्स्य व्यवसाय विकास अधिकारी, गट-क संवर्गाकरीता संयुक्त पूर्व परीक्षा व स्वतंत्र मुख्य परीक्षा घेण्यात येईल. नव्याने समाविष्ट केलेल्या तांत्रिक संवर्गांची शैक्षणिक अर्हता विचारात घेऊन मुख्य परीक्षेचा अभ्यासक्रम संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

३. महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२६ मध्ये दिनांक २२ जुलै, २०२६ रोजीच्या शुद्धिपत्रकान्वये नव्याने समाविष्ट झालेल्या संवर्गाकरीता आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता विचारात घेऊन, यापूर्वी प्रस्तुत परीक्षेकरीता अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी त्यांच्या अर्जामध्ये नमूद केलेल्या शैक्षणिक अर्हतेच्या आधारे उमेदवार ज्या-ज्या संवर्गासाठी शैक्षणिक अर्हतेनुसार पात्र ठरेल त्या-त्या संवर्गाकरीता त्यांची उमेदवारी विचारात घेण्यात येईल. यास्तव, प्रस्तुत परीक्षेमध्ये जरी नवीन संवर्गांचा समावेश झाला, तरी यापूर्वी अर्ज सादर केलेल्या उमेदवारांना नव्याने अथवा पुन्हा अर्ज सादर करण्याची आवश्यकता नाही.

४. महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२६ मधील सहाय्यक मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी (तांत्रिक),गट-क संवर्गाच्या दिनांक २३ ऑगस्ट, २०१६ रोजी अधिसूचित सेवा प्रवेश नियमानुसार प्रस्तुत संवर्गाकरीता " मत्स्यविज्ञान विषयातील किमान द्वितीय श्रेणीतील पदवी (B.F.Sc.) धारण करणे" आवश्यक आहे. प्रस्तुत पूर्व परीक्षेच्या जाहिरातीमधील परिच्छेद ६.३.१(५) अनुसार सहाय्यक मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी (तांत्रिक),गट-क संवर्गाकरीता B.F.Sc. पदवीच्या अंतिम वर्षाच्या परीक्षेस बसलेल्या उमेदवारांचे (Appear) अर्ज स्वीकारण्यात येत आहेत. तथापि, सदर उमेदवारांनी मुख्य परीक्षेच्यावेळी B.F.Sc. शाखेतील किमान द्वितीय श्रेणीतील पदवी सादर करणे अनिवार्य राहील.

५.....

५. सद्यस्थितीत महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२६ मध्ये समाविष्ट संवर्गाकरीता पूर्व व मुख्य परीक्षा खालीलप्रमाणे आयोजित करण्यात येईल :-

अ.क्र.	संवर्ग	संयुक्त पूर्व परीक्षा	मुख्य परीक्षा
१	उद्योग निरीक्षक, उद्योग संचालनालय	सर्व संवर्गांकरीता एकच पूर्व परीक्षा	सहायक मोटार वाहन निरीक्षक, गट-क व सहाय्यक मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी (तांत्रिक), गट-क संवर्ग वगळून उर्वरित सर्व संवर्गाकरीता एकच मुख्य परीक्षा
२	दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क		
३	तांत्रिक सहायक, विमा संचालनालय		
४	कर सहायक		
५	विविध नियुक्ती प्राधिकारी निहाय लिपिक-टंकलेखक		
६	विविध नियुक्ती प्राधिकारी निहाय ग्राम महसूल अधिकारी (तलाठी),		
७	वरिष्ठ अभिलेखापाल/ वरिष्ठ लिपिक/ अभिलेखापाल, गट-क		
८	सहायक अधीक्षक, गट-क		
९	सहायक मोटार वाहन निरीक्षक		स्वतंत्र मुख्य परीक्षा
१०	सहाय्यक मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी (तांत्रिक),गट-क		स्वतंत्र मुख्य परीक्षा

६. महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त परीक्षेसंदर्भात होणाऱ्या सुधारणांबाबत आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्धीपत्रक/शुद्धिपत्रक वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येईल. सदर प्रसिद्धीपत्रक/शुद्धिपत्रकाचे संबंधित उमेदवारांनी वेळोवेळी अवलोकन करणे आवश्यक आहे.

(सं. पां. देशमुख)
उप सचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.